# मिरा भाईंदर महानगरपालिका

**माहिती व जनसंपर्क विभाग**

**प्रसिद्धीपत्रक**

- **मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात सुरळीत होणारा पाण्याचा पुरवठा ५ डिसेंबर २०२५ रोजी सकाळी ७ वाजल्यापासून पुढील १२ तास खंडित**

सर्व नागरीकांना कळविण्यात येते की, मिरा-भाईंदर शहरास स्टेम प्राधिकरण व महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ (एम.आय.डी.सी.) प्राधिकरणाकडून पाणी पुरवठा करण्यात येतो.ओवळा, कासारवाडवली येथे एम.एम.आर.डी.ए. अंतर्गत रोड रुंदीकरण करण्यात येत असून त्या ठिकाणी स्टेम प्राधिकरणामार्फत तीन एअर व्हाँल्व स्थलांतरित करण्यात येणार आहेत. तसेच मिरा-भाईंदर शहरातील भाईंदर (पुर्व), आझाद नगर, अश्विनी बँक्वेट हॉल समोरील महानगरपालिकेच्या १००० मी.मी. व्यासाच्या मुख्य जलवाहीनीवर अचानक गळती सुरु झाली आहे. गळती बंद करण्याचे काम करण्याकरीता १२ तासांचा शटडाऊन घेणे अत्यावश्यक आहे. उपरोक्त दोन्ही कामे करणेकरीता शुक्रवार दि.०५/१२/२०२५ रोजी सकाळी ०७.०० ते सायं. ०७.०० वाजेपर्यत (१२ तासाकरीता) मिरा-भाईंदर शहरास स्टेम प्राधिकरणमार्फत होणारा पाणी पुरवठा पुर्णपणे बंद राहणार आहे.

तसेच महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ (एम.आय.डी.सी.) प्राधिकरणाकडून होणारा पाणी पुरवठा सुरु राहणार आहे. तरी स्टेम प्राधिकरणकडून होणारा पाणी पुरवठा पुर्ववत होईपर्यत मिरा-भाईंदर शहरास पाणी पुरवठा कमी दाबाने व उशीराने होईल. नागरीकांनी पाण्याचा वापर काटकसरीने करावा व महानगरपालिकेस सहकार्य करावे.